महाराष्ट्र शासन
आयुक्तालय
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, ४ था मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डी. मेलो रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी : 022-22620361-65 संकेतस्थळ : dmer.maharashtra.gov.in

आज़ादी का अमृत महोत्सव

क्र.आवैशिसवआ/बी.ऑप्टोमेट्री/प्रवेश परीक्षा/२०२६ दिनांक : २०/११/२०२६

सुचना

विषय : सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील वॅचलर ऑफ ऑप्टोमेट्री पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत...

संदर्भ : १. आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष दिनांक ०४.११.२०२६ रोजीची नोटीस
२. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे दिनांक १६.११.२०२६ रोजीच्या पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापठ, नाशिक यांच्याशी सलग्नित Bachelor of Optometry संस्थांची यादी आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष विभागास विद्यापीठाच्या दिनांक १३.०८.२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाली होती. सदरील यादीच्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक १ रोजीच्या नोटीस अन्वये BACHELOR of Optometry अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याबाबत संस्थाना कळविण्यात आलेले होते.

त्यानंतर NCAHP (NATIONAL COMMISSION FOR ALLIED AND HEALTHCARE PROFESSIONS) यांच्यामार्फत अलीकडेच निर्गमित करण्यात आलेल्या नवीन मार्गदर्शक सूचना व त्यानुसार नियमांमध्ये करण्यात आलेल्या बदलांमुळे विद्यापीठाशी संलग्नित ALLIED HEALTH COURSES चालविणाऱ्या महाविद्यालयांना शैक्षणिक व प्रशासकीय स्तरावर विविध अडचणीचा सामना करावा लागत असल्याचे विद्यापीठास निदर्शनास येत आहे. सदर बाबीचे गांभीर्य लक्षात घेता, नवीन मार्गदर्शक सूचना व नियमांमधील बदलांमुळे महाविद्यालयीन स्तरावर उद्भवणाऱ्या अडचणी व समस्यांबाबत चर्चा करून त्यावर योग्य तोडगा काढण्याच्या दृष्टीने विद्यापीठाशी संलग्नित संबंधित महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक समवेत ऑनलाईन आढावा बैठक दिनांक १७.११.२०२६ रोजी १२:०० वाजता आयोजित करण्यात येत असल्याबाबत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी संदर्भ क्रमांक २ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, NCAHP (NATIONAL COMMISSION FOR ALLIED AND HEALTHCARE PROFESSIONS) चे अध्यक्ष तसेच सर्व ALLIED HEALTH COURSES चालविणाऱ्या महाविद्यालय/संस्था सदरील ऑनलाईन बैठकीस उपस्थित होते. सदरील बैठकीत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी NCAHP (NATIONAL COMMISSION FOR ALLIED AND HEALTHCARE PROFESSIONS) आयोगामार्फत पुर्ण माहिती प्राप्त झालेली नसल्यामुळे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत BACHELOR OF OPTOMETRY अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरू केलेली नाही. यास्तव, बैठकीत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी दिलेल्या सुचनेनुसार खालील प्रमाणे सर्व महाविद्यालय/संस्थाना कळविण्यात देण्यात येत आहे.

१) विद्यापीठाशी संलग्नित Allied Health Courses या अभ्यासक्रमाबाबत NCAHP (National Commission for Allied and Healthcare Professions) यांच्यामार्फत अलीकडेच निर्गमित करण्यात आलेल्या नवीन मार्गदर्शक सूचना व त्यानुसार तयार करण्यात आलेल्या नियमांची पुर्तता महाविद्यालयामार्फत पुर्ण होत असल्यास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) Bachelor of Optometry अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया NCAHP (National Commission for Allied and Healthcare Professions) आयोगाच्या नियमानुसारच करण्यात यावा.

३) NCAHP (National Commission for Allied and Healthcare Professions) आयोगाच्या नियमांची पुर्तता संस्थामार्फत होत नसल्यास प्रवेश प्रक्रिया सध्या राबविण्यात येऊ नये.

४) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता Bachelor of Optometry संस्थांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापठ, नाशिक यांच्यामार्फत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचनेनंतरच प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

20.11.26

(अनिल भंडारी)भा.प्र.से.
आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष

प्रति,

1 PBMA's H.V. Desai Eye Hospital, Hadapsar, Pune
2 Laxmi Charitable Trust, Laxmi college of Optometry, Panvel
3 Lotus Hospitals Trust Lotus College of Optometry, Juhu, Mumbai
4 Mahyco Research Foundation Trust, Shri Ganapati Netralaya College of Optometry, Jalna
5 Maharashtra Institute of Optometry, BSc Optometry & Diploma in Optometry college, Latur
6 Smt. Indirabai Wavikar Charitable Trust, Wavikar College of Optometry, Majiwade, Thane
7 Nandadeep Eye Hospital, Nandadeep School of Optometry, Sangli
8 Sant Gajanan Maharaj College of Optometry, Mahagaon, Tal, Gadhinglaj, Dist. Kolhapur
9 Yashodeep BahuUddeshiya Samajik Shaikshanik Sanstha's Dr. Shivajirao Ghogare Optometry Institute, Osmanabad.
10 Netradeep college of optometry, Beed.
11 Maharashtra University of Health Sciences (MUHS), Aurangabad.
12 Birla College of Optometry, College of Optometry & Ophthalmic Sciences, Nashik .
13 Ankur Institute of Optometry & Ophthalmic Sciences, College of Optometry, Gadhinglaj, Kolhapur
14 Dudhabhate Healthcare Private Limited, Wadgaon (BK), Pune

प्रत,
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, दिंडोरी रोड, नाशिक